# "ब" वर्ग तिर्थक्षेत्रे :-

(अ) ग्रामीण भागातील तिर्थक्षेत्राच्या महात्म्यामुळे सदर तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी दररोज अंदाजे १५०० ते २००० भाविकांची किंवा त्यापेक्षा कमी भाविकांची आणि यात्रा / उत्सवाच्या वेळी दरवर्षी चार लाखापेक्षा जास्त भाविकांची उपस्थिती असते. या उपस्थितीच्या अनुषंगाने जिल्हा पोलीस अधिक्षक यांनी शासनाने विहीत केलेल्या प्रमाणपत्रात भाविकांची उपस्थिती प्रमाणित करुन दिल्यास अशी तिर्थक्षेत्रे वर्ग तिर्थक्षेत्र दर्जा मिळण्याकरिता पात्र ठरु शकतील.

"ब" वर्ग तिर्थक्षेत्रांस वर्ग दर्जा मिळण्यासाठी संबंधित जिल्हा परिषदांनी खालील कागदपत्रांसह सोबत जोडलेल्या विहित प्रपत्रात (परिशिष्ट-अ) प्रस्ताव सादर करावा.

१. वर्षभरात चार लाखापेक्षा जास्त भाविकांच्या उपस्थितीबाबत जिल्हा पोलीस अधिक्षक यांचे शासनाने विहित केल्याप्रमाणे प्रमाणपत्र.

२. संबंधित ग्राम पंचायतीचा / संबंधित देवस्थान ट्रस्ट या संस्थेचा विकासाबाबतचा ठराव.

३. ग्राम पंचायत / देवस्थान ट्रस्ट यांच्या मालकीच्या जागेचा ७/१२ उतारा.

४. जागेचा नमुना ८ उतारा असल्यास सदर जागेवर प्रस्तावित कामांचे बांधकाम करण्याबाबत ग्राम पंचायत/ट्रस्टची प्रमाणपत्र.

५. प्रत्येक सुविधासाठी लागणारी जमीन, तेवढीच जमीन ग्राम पंचायत / जिल्हा परिषदेला हस्तांतरीत करण्यात यावी. यासाठी देवस्थान ट्रस्टच्या मालकीची जागा (जागेचा ७/१२ उतारा किंवा नमुना ८ उतारा) असल्यास रु.१००/- च्या स्टँप पेपरवर सदर जागा ग्राम पंचायत / जिल्हा परिषदेकडे हस्तातरीत करण्यात येत आहे, अशा प्रकारचे देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष, यांची सही व शिक्का असलेले प्रमाणपत्र.

६. प्रस्तावित कामे अन्य कोणत्याही योजनेतून घेण्यात आली नसल्याचे ग्राम पंचायत / जिल्हा परिषद यांचे प्रमाणपत्र.

७. प्रस्तावित कामांच्या बांधकामासाठी उपलब्ध असलेली जागा वनक्षेत्रात येत नसल्याचे वन विभागाचे प्रमाणपत्र.

८. देवस्थान परिसराचा मोठ्या आकाराचा (६० सें.मी. x ६० सें.मी.) रंगीत साईट प्लॅन (त्यामध्ये देवस्थानचा परिसर, मालकीची असलेली जागा, चहूबाजूंनी होणारा रस्ता, तेथे उपलब्ध असणाऱ्या सुविधा (Existing) आणि उपलब्ध करुन द्यावयाच्या सुविधा (Proposed) इ. समावेश असावा).

९. सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती यांनी तिर्थक्षेत्रास 'क' वर्ग दर्जा असल्याबाबत प्रमाणित केलेले प्रमाणपत्र किंवा जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीच्या इतिवृत्ताची सत्यप्रत३

उपरोक्त नमूद १ ते ९ येथील कागदपत्रांची पूर्तता करण्यात आलेली किंवा नाही ते पाहून त्या आधारे वाचा मधील ३ अन्वये नियुक्त करण्यात आलेल्या राज्य निकष समितीद्वारा 'ब' वर्ग दर्जा देण्याबाबतचा निर्णय घेण्यात येईल.